सं.के.नं.**९९० /२०२४**
नि.क्र. **३५/क च्या पुढे**

अभियोगपक्षातर्फे **साक्षीदार क्र. ४** याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | **राजाराम बजरंग कांबळे** |
| वय | - | **५० वर्षे** |
| व्यवसाय | - | **सुरक्षा रक्षक** |
| राहणार | - | **कळंबोली नवी मुंबई** |

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. देशमाने यांच्याद्वारे...</u>**

१. मी इंडियन ऑईल अदानी व्हेचर्स येथे सुरक्षा रक्षक म्हणून नोकरीस आहे. माझी सकाळी ९.०० ते संध्याकाळी ५.०० अशी कामाची वेळ असते. मी डयुटीवर असताना सकाळी १०.४५ च्या सुमारास धुतुम गावातील २० ते २१ लोक कंपनीच्या मेन गेट समोर येउन बसलेत. त्यांना तेथे बसू नका असे मी माझ्या सहाकार्यांनी म्हटले असता त्यांनी आम्ही येथून हलणार नाही असे म्हटले. त्यामुळे मी फोनव्दारे कंपनीचे एच.आर मॅनेजर संदीप काळे यांना माहिती दिली. त्यामुळे संदिप काळे गेटवर आले. गावातील तेथे असलेल्या मुख्य चार ते पाच लोकांसोबत ते बोलत होते. परंतु ते लोक ऐकून घेत नव्हते. त्यानंतर सकाळी ११ च्या सुमारास उरण पोलिस ठाण्याचे पोलिस तेथे आले. पोलिसांचे सुध्दा त्या लोकांनी न ऐकल्याने पोलिसांनी त्या लोकांना व्हॅनमध्ये भरून पोलिस ठाण्यात नेले. त्यानंतर दिनांक ०६.०३.२०२४ रोजी पोलिसांनी मला जबाब घेण्यासाठी बोलवले. त्यावेळी पोलिसांनी माझे सहकारी दोन सुपरवायझर आणि एक हेडगार्ड यांनासुध्दा जबाब घेण्यासाठी बोलावले होते.

**<u>उलटतपास आरोपीचे वकील श्री. प्रज्ञा सरवणकर यांचेमार्फत सुरू ...</u>**

२. मी ड्युटीवर असल्याबाबत रजिस्टर वर सही करतो. पोलिसांनी ते

रजिस्टर कंपनीकडून घेतले किंवा नाही याचे मला माहिती नाही. मी तेथे महाराष्ट्र सुरक्षा बल अंतर्गत नोकरीस आहे. त्यावेळी मी कंपनीत कामाला असणा-या काही लोकांनी नावाने ओळखत होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी गावातील लोकांना नावानिशी ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, ते लोक घोषणा देत नव्हते व बॅनर आणलेले नव्हते. तेथे इंटर व आउट अशी दोन गेट आहेत. मी त्यावेळी मुख्य इन गेटला होतो. हे म्हणणे खरे नाही की, संदीप काळे माझे वरीष्ठ असल्याने त्यांच्या दबावाखाली मी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सतीश म्हात्रे, अजिंक्य देशापांडे कंपनीतील कामगार आहेत. मला आरोपींपैकी दोन ते चार लोकांची नावे सांगता येतात. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनेच्या दिवशी सुट्टीवर होतो. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील माहिती खोटी सांगीतली आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

**उरण,** **(एस.पी. वानखडे )**

**दिनांक – २७/०३/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग उरण**